सकाळ

# ‘रवळनाथ’तर्फे महिला, सैनिकांसह ज्येष्ठांना दिलासा : एम. एल. चौगुले

▸ सकाळ वृत्तसेवा



एम. एल. चौगुले

गडहिंग्लज, ता. २ : श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीने ठेवींसाठी व्याज दरात वाढ करून नागरिकांना नववर्षाची भेट दिली आहे. महिला, आजी-माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या नव्या व्याजदराची अंमलबजावणी सुरू झाली आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, ‘‘रिझर्व्ह बँकेच्या रेपो रेटमध्ये झालेली वाढ व केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीसाठी काही प्रमुख अल्पबचत योजनांच्या व्याजदरात वाढ केली आहे.

या पार्श्वभूमीवर रवळनाथनेही ठेवींच्या व्याजदरात वाढ करून संस्था व वैयक्तिक ठेवीदारांना भेट दिली आहे. या निर्णयाने सेव्हिंग ठेवी, रवळनाथ सेव्हिंग ठेवींसह अन्य कालावधींसाठीच्या ठेवींना जादाचे व्याजदर असतील. महिला व आजी-माजी सैनिकांना ठेव व्याजात पाव टक्का जादा, तर कर्जातही अर्धा टक्का सवलत आहे. याचा ठेवीदारांनी लाभ घ्यावा.’’ या वेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सीईओ डी. के. मायदेव, अधिकारी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
03/01/2023 Page No. 4